कासव आणि बेट

पापुआ न्यू गिनी देशाची लोककथा



कासव आणि बेट

कथाकथन: बार्बरा विल्सन

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन



फार फार वर्षांपूर्वी जेव्हा कासवाच्या तोंडात दात होते तेव्हा समुद्रात एक महाकाय कासव राहात होते. ते जगातील सर्वात मोठे कासव होते. ते आपला बहुतांशी वेळ विशाल सागरात पोहत घालवत असे. आज आपण या सागराला *प्रशांत महासागर* म्हणतो.

महाकाय कासव हळूहळू पोहत समुद्रातील मासे, वनस्पती आणि किनाऱ्यावरील खडकांत दडून बसलेले शिंपले खात असे. ते विशाल सागराच्या एका किनाऱ्यावरून विरुद्ध किनाऱ्यावर पोहत ये-जा करत असे.





ते समुद्रात कधी पाण्याच्या वर तर कधी पाण्यात खोलवर पोहत असे. पाण्यावर येऊन ते स्वच्छ, ताजी हवा श्वासात भरून घेत असे आणि सूर्याचे ऊन अंगावर घेत असे. आभाळाकडे नजर टाकून ते दिवसा सूर्य आणि रात्री चंद्र बघत असे. त्याला समुद्राच्या एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनारी उडत जाणारे पक्षीदेखील दिसत असत. ते पाण्याच्या खाली बघत असे. खोलवर त्याला गुडूप अंधार दिसत असे.

कधीकधी पोहून पोहून कासव दमून जात असे. मग ते समुद्राच्या पृष्ठभागालगत पाण्यात स्तब्ध राहून आराम करत असे. पण त्याला ऊन्हात शांतपणे बसून आराम करायची इच्छा होत असे. त्याच्या मनात येई, “किती छान झालं असतं जर या विशाल सागरामध्ये जमिनीचा एक असा तुकडा असता जिथे बसून आपल्याला मनासारखा आराम करता आला असता!”

सागराच्या खाली खूप खोलवर जिथे कासव पोहत असे तिथे एका गुहेत एक मनुष्य राहत असे. त्या विशाल सागरात तो एकमेव मनुष्यप्राणी होता. त्याला ना पत्नी होती, ना मुले ना सगेसोयरे. सागराखाली त्या गुहेत तो एकाकी होता. एकाकीपणामुळे त्याचे हृदय किनाऱ्यावरच्या दगडासारखे जड झाले होते. तो आपल्या एकाकीपणाला कंटाळला होता.



एकदा कासव पाण्यात पोहत पोहत समुद्राच्या मध्यावर पोहोचले. तिथे समुद्राच्या तळाला एक मातीची टेकडी होती. ती एवढी उंच होती की तिचे शिखर जवळजवळ पाण्याच्या पृष्ठभागाला स्पर्श करत होते.

“मी याच्यावर आणखी माती आणि दगड आणून टाकले तर टेकडीचं शिखर पाण्याच्या वर येईल,” कासवाच्या मनात आले. “दिवसा याच्यावर सूर्य चमकू लागेल तेव्हा मी इथे उन्हात बसून छानपैकी आराम करू शकेन. पोहून पोहून थकल्यावर इथे बसून मी स्वच्छ हवेत श्वास घेऊ शकेन.”



कासव समुद्राच्या दुसऱ्या भागात असलेल्या तळावर गेले. तिथून दगड-माती खणून ते त्या टेकडीवर आणून टाकू लागले. त्यासाठी अगणित वेळा त्याने ये-जा केली. अनेक सूर्योदय आणि सूर्यास्त होऊन गेले. चंद्र कलेकलेने वाढत गेला, कमी होत गेला. हळूहळू टेकडीची उंची वाढू लागली. शेवटी, त्याचे शिखर पाण्याच्या पृष्ठावर दिसू लागले आणि कासवाच्या मनासारखे बेट एकदाचे तयार झाले. आपले काम पूर्ण झाले आहे, याची कासवाला जाणीव झाली.

मग सागराच्या एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनाऱ्याकडे उडणाऱ्या पक्ष्यांनी रोपट्यांच्या आणि झाडांच्या बिया आणल्या आणि बेटावर टाकल्या. त्यामुळे तिथे गवत, फुलझाडे आणि उंच उंच झाडे उगवली. तेथील खडक आणि माती हिरवाईने भरून गेली. ते बेट आता रमणीय आणि सुपीक दिसू लागले. त्याच्या सभोवतालच्या समुद्रात लहानमोठे असंख्य प्रकारचे मासे पोहू लागले.



आपण बनवलेल्या बेटावर कासव छानपैकी आराम करू लागले. आता पाण्यात पोहून झाल्यावर आराम करण्यासाठी त्याला पाण्याच्या पृष्ठभागाखाली थांबण्याची गरज नव्हती. अजूनही ते समुद्रात मनसोक्त पोहत असे. पण ते कधी आपल्या बेटापासून फारसे दूर जात नसे.

एकदा कासव खोल खोल समुद्रात गेले. कधी नव्हे एवढ्या खोल समुद्रात ते पोहोचले. तिथे काळकभिन्न अंधार आणि खूप गारठा होता. तिथे सूर्यप्रकाश आणि ऊन्हाची नामोनिशाणी नव्हती.

अचानक, कासव त्या गुहेत शिरला जिथे एकाकी मनुष्य दीर्घकाळ राहात होता. कासवाला बघून मनुष्याला फार आनंद झाला. त्याने कासवाला त्याच्यासाठी एक पत्नी शोधून आण, अशी विनंती केली. तिच्यासोबत तो आयुष्य घालवू शकला असता, त्यांना मुले झाली असती. कासवाला मनुष्याच्या एकाकीपणाची दया आली. त्याने मनुष्याला पाठीवर बसवून आपल्या बेटावर नेले.



मग कासव समुद्रात पोहत पोहत जवळच्या एका किनाऱ्यावर गेला. किनाऱ्यावर एक सुंदर स्त्री उभी होती. ती त्या मनुष्यासारखीच एकाकी असल्यामुळे रडत होती. आपल्याला एक पती आणि मुले असावीत, अशी तिची इच्छा होती. म्हणून कासव तिला पाठीवर बसवून त्या मनुष्याची पत्नी बनवण्यासाठी आपल्या बेटावर घेऊन आला.



तो मनुष्य आणि ती स्त्री त्या बेटावर आनंदाने एकत्र राहू लागले. ते हसू-खिदळू लागले, समुद्राच्या पाण्यात खेळू लागले, कधी भांडूही लागले, पण आपल्या आयुष्यातील आनंद त्यांनी कमी होऊ दिला नाही.

त्यांना गोंडस मुले झाली आणि त्या मुलांना पुढे मुले झाली. अशा प्रकारे बेट माणसांनी भरून गेले. ते शेती करू लागले, त्यांनी घरे बांधली आणि ते सागरकिनारी मासेमारी करू लागले.

काळ सरला तसे विशाल कासवाने बनवलेले ते बेट *न्यू गिनी* या नावाने ओळखले जाऊ लागले.

समाप्त